CMYK

२६ वा सामना

लखनौ सुपरजाएंटस् वि. गुजरात टायटन्स

वेळ : ३.३० वा. स्थळ : लखनौ

२७ वा सामना

सनरायजर्स हैद्राबाद वि.पंजाब किंग्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : हैदराबाद

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आज हनुमान जयंती



श्रीप्रभू रामचंद्र यांचे भक्त
श्री हनुमान यांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५ । वर्ष : २३ वे अंक : १९३ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# सोलापुरात शरद पवार राष्ट्रवादीच्या बैठकीत मानापमानाचा तमाशा

# हर्षवर्धन पाटील अन् शशिकांत शिंदेंसमोरच पैलवानसह महिला बाहेर

सोलापूर/खास प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सोलापुरात पश्चिम महाराष्ट्र विभागीय मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्या मेळाव्यात पक्षश्रेष्ठींसमोरच नाराजीनाट्य आणि मानापनाचा तमाशा झाला. मेळावा सुरू असताना बसायला खुर्ची दिली नाही म्हणून पक्षाचे कार्याध्यक्ष तौफिक शेख हे मेळावा सोडून निघून गेले. दुसरीकडे, व्यासपीठावर महिला पदाधिकाऱ्यांना स्थान दिल्याने महिलांनीही संयोजकांवर खडे फोडत दुर्गावतार घेतला. पक्षाचे महाराष्ट्राचे प्रभारी हर्षवर्धन पाटील अन् शशिकांत शिंदेंसमोरच मानापनाचा तमाशा झाला. नाराजी नाट्य रंगले.**

ज्येष्ठ नेते शरद पवार हे आज (ता. १२ एप्रिल) सोलापूर दौऱ्यावर येणार होते. त्या पार्श्वभूमीवर, पश्चिम महाराष्ट्राचे प्रभारी हर्षवर्धन पाटील आणि शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत सोलापूर शहर आणि ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा मेळावा शुक्रवारी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीनंतर पक्षाचा प्रथमच जाहीर कार्यक्रम होता, त्यामुळे गर्दीही मोठ्या प्रमाणात झाली होती.

दरम्यान मेळावा सुरू असताना बसायला खुर्ची दिली नाही; म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर कार्याध्यक्ष तौफिक शेख हे भरसभेतून निघून गेले. त्यांनी यादरम्यान माध्यमांशी संवाद साधत आरोपाचे तोफगोळे फोडले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळेच पक्षाची ताकद कमी झाली आहे, असा आरोप शेख यांनी केला, त्यामुळे येत्या काळात पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा इशारासुद्धा कार्याध्यक्ष शेख यांनी दिला.

दरम्यान, ज्येष्ठ नेते शरद पवार हे उद्या सोलापूरच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांची भेट घेऊन त्यांच्या कानावर हा आज घडलेला विषय टाकणार आहे, असेही तौफिक शेख यांनी स्पष्ट केले होते. तथापि, शरद पवारांचा सोलापूर दौराच रद्द झाल्याने घडला प्रकार शरद पवारांच्या कानावर घालणे शेख यांना शनिवारी (ता.१२) शक्य होणार नाही, हे उघड आहे.



सोलापूर : राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात बोलताना हर्षवर्धन पाटील.

## श्रेष्ठींसमोरच रणरागिणींचा चढ्या आवाजात संताप

एकीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोलापूर शहर कार्यध्यक्ष तौफिक शेख हे निघून गेले. दुसरीकडे, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील आणि आमदार शशिकांत शिंदे यांच्यासमोरच महिला आणि पुरुष पदाधिकाऱ्यांची नाराजी व्यक्त केली. शहर कार्याध्यक्ष तौफिक शेख बैठकीतून संतापून निघाले. पक्षात आम्हाला कोणत्याही पद्धतीची सन्मानाची वागणूक मिळत नाही, त्यामुळे मी बैठकीतून निघून जात आहे. त्याचवेळी महिला पदाधिकाऱ्यांकडूनही हर्षवर्धन पाटील आणि शशिकांत शिंदे यांच्या समोरच चढ्या आवाजातच नाराजी व्यक्त करण्यात आली.

## टायगर पैलवान की अगली मंझिल... अजितदादा राष्ट्रवादी..?

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर शहर कार्याध्यक्ष तौफिक शेख हे या पक्षात नाराज असल्याची चर्चा आहे. कार्यकर्त्यांची कामे होत नाहीत, पक्षात कोणाचा ताळमेळ नाही, आपली कामेच होत नसतील तर या पक्षात थांबून उपयोग का? अशी भूमिका पैलवान तौफिक शेख यांच्या कट्टर समर्थक आणि कार्यकर्त्यांची आहे. त्याशिवाय या पक्षात काही ठराविक पदाधिकाऱ्यांचे प्राबल्य आहे, ते तौफिक यांना विश्वासात घेत नाहीत, मानसन्मान देत नाहीत, या सगळ्या पार्श्वभूमीवर, तौफीक शेख हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार हा पक्ष सोडण्याच्या मानसिकतेत आहेत, पक्ष सोडण्याबद्दल त्यांच्यावर कार्यकर्त्यांचा दबाव वाढतोय, त्यातून ते शरदचंद्र पवार पक्षाची तुतारी खाली ठेवत अजित पवार राष्ट्रवादी गटाचे 'घड्याळ' मनगटावर बांधण्याच्या मनस्थितीत असल्याचा बोलबाला त्यांच्या कट्टर समर्थकांमध्ये आहे. तशी चर्चा आहे.

- संताप अनावर झालेल्या तौफिकभाईंनी पक्षातलं सगळंच बाहेर काढलं
- व्यासपीठावर संधी न दिल्याने महिला कार्यकर्त्यांनी घेतला दुर्गावतार
- कार्याध्यक्षांनी रागाच्या भरात व्यक्त केली मनातील खदखद
- मनमानीमुळे पक्षात दम राहात नसल्याचा केला गंभीर आरोप



तौफिक शेख

"शहर कार्याध्यक्ष तसेच महिला पदाधिकाऱ्यांनादेखील व्यासपीठावर स्थान दिले जात नाही. तसेच मेळावा घेण्याबाबत आम्हाला कोणतीही कल्पना दिली जात नाही. पक्षाचे शहराध्यक्ष आणि ठराविक कार्यकर्तेच पक्षामध्ये पुढे पुढे करतात, त्यामुळे आम्ही पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत आहोत. कार्यकर्त्यांशी चर्चा करून आम्ही पुढची भूमिका घेणार आहोत, असेही महिला कार्यकर्त्यांनी सांगितले.

**–तौफिक शेख, कार्याध्यक्ष,**
सोलापूर शहर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी

## कन्हेरगाव येथे दिवसा घरफोडी

टेंभुर्णी : शेतामधील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील १७ ग्रॅम वजनाचे दागिने पळवले. ही धाडसी चोरी कन्हेरगाव (ता.माढा) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. या संदर्भात अनिता विजय माने (रा.कन्हेरगाव) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. अनिता माने यांचे कन्हेरगाव येथील शेतात घर आहे. दुपारी एक वाजेच्या सुमारास त्या घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. दरम्यान चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि बेडरूम मधील कपाटात ठेवलेले १७० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. तासाभरात त्या परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरीस गेलेल्या दागिनात गंठण, मोहनमाळ बांगड्या आणि अंगठ्या याचा समावेश असल्याचे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील सभा फौजदार सोनटक्के कधी आहेत.

## अचानक दौरा रद्द झाल्याने सारा प्लॅनच फिसकटला...

सोलापूर/विशेष प्रतिनिधी


शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे शनिवारी सोलापूरच्या दौऱ्यावर येणार होते. या दौऱ्यात त्यांच्याकडून राजकिय रणनीतीची कोणती नवी चावी फिरवली जाणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून होते. मात्र शुक्रवारी रात्री पवारांचा दौरा रद्द झाल्याची बातमी थडकताच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या उत्साहावर पाणी फेरले. विधानसभा निवडणुकित राज्यात महायुतीची लाट असतानाही सोलापूर जिल्ह्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पाठराखण करत तब्बल चार आमदार निवडून दिले. विधानसभा निवडणुकीत मोठे यश पदरात टाकत सोलापूरकरांनी पवारांवरील आपले प्रेम पुन्हा एकदा अधोरेखित केले होते.तेव्हा पवारांकडून पक्ष बांधणीची नवी रचना आखली जाईल,असे सांगण्यात आले होते.मात्र दौराच रद्द झाल्याने सारा प्लॅनच फिसकटला. ज्येष्ठ नेते शरद पवार हे विधानसभा निवडणुकीनंतर शनिवारी प्रथम सोलापूरच्या दौऱ्यावर होते. विधानसभा निवडणुकीत राज्यभरात पडझड झाल्याने महाविकास आघाडी सत्तेपासून दूर राहिली. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवारांचा हा दौरा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी 'टॉनिक' ठरण्याची शक्यता होती. विधानसभेतील यशानंतर सोलापुरातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष काहींसा विस्कळीत झाल्याचे दिसून येत आहे. सोलापूर शहराचे नेतृत्व करणारे महेश कोठे यांचा कुंभमेळ्यात दुर्दैवी मृत्यू झाला. कोठे यांच्या जाण्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे. त्या धक्क्यातून सोलापूर शहर राष्ट्रवादी अद्याप सावरलेली दिसत नाही. कोठे यांच्या तोडीचा नेता अजून पक्षाला मिळालेला नाही.

### मास लिडरचा अभाव

दुसरीकडे, महायुतीच्या माध्यमातून राज्याच्या सत्तेत असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे पवारांच्या राष्ट्रवादीतील अनेकांचा ओढा असल्याचे दिसून येत आहे. त्याला सत्ता हेही कारण असू शकते. कारण, पक्षाकडे जनमाणसातील नेता म्हणजेच मास लिडर नसल्याचे प्रकर्षाने जाणवते. आता शहरातील उर्वरीत पदाधिकाऱ्यांना पवार कशा पद्धतीने कामाला लावतात, याविषयी उत्सुकता होती.


### सोलापूरऐवजी साताऱ्याला...

सोलापूरचा आजचा दौरा रद्द करून पवार हे शनिवारी साताऱ्याच्या दौऱ्यावर जाणार आहेत.रयत शिक्षण संस्थेची बैठक लावल्यामुळे त्यांना तिकडे जावे लागणार आहे.त्यामुळे आजचा त्यांचा दौरा रद्द झाल्याने पक्षाच्या एका नेत्याकडून सांगण्यात आले.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




पण ते आपल्याला 'दररोज' पाणी ठेवतात!

संगम श्री डे
800-88-260

संगम श्री नाईट
247-33-670

कल्याण
345-23-238

मुंबई
589-23-256

# पित्याच्या नात्याबद्दल पोटच्या पोरीचं प्रेम पाझरलं, बापाला, तुरुंगातून बाहेर काढलं, मायेच्या पाण्यानं 'संतापाला' विझवलं!

सोलापूर/खास प्रतिनिधी

जन्मदाता पिता अन् लेकीच अत्यंत जिवाभावाचं नातं. जणू दुधावरच्या सायीप्रमाणं एकमेकांना जपणारं हे नातं. पण कलियुगात आयुष्याचा जोडीदार स्वत:च्या मर्जीप्रमाणे ठरविण्याच्या लेकींच्या विचारातून या नात्यामध्ये कटुता निर्माण होतेय. 'लक्ष्मी'च्या पावलांनी घरी आलेल्या लाडक्या लेकीला तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलेला पिता जेव्हा मर्जीतील मुलासोबत लग्न करायला अडसर ठरतो, तेव्हा तो दुष्मन वाटायला लागतो. ज्या पित्याच्या अंगा खाद्यांवर वाढलेल्या 'तिच्या' मनात बापाबद्दल घृणा येते, तेव्हा त्याच वळणावर बाप–लेकीमधील अत्यंत प्रेमळ अन् जिव्हाळ्याचं नातं तुटण्याच्या वळणावर येतं. असाच बाप–लेकीमधील नात्यावर कटुतेचे ढग आले होते. पण पुढं घडलं ते वेगळंच अन् अनपेक्षित. पित्याच्या नात्याबद्दल पोटच्या पोरीचं हृदय पाझरलं. बापाला, तिनं चक्क तुरुंगातून बाहेर काढलं, तिच्या मायेच्या पाण्यानं बापाच्या 'संतापाला' कायमचं विझवलं. आंतरजातीय विवाहावरुन दुरावलेल्या नात्यांना पुन्हा बहर येण्याचा ट्रॅक झाला.

दक्षिण काशी पंढरपरपूरच्या न्यायलयात चालेल्या खटल्यासंबंधींची खरीखुरी स्टोरी. मुलींचे बापावर अगाध प्रेम असते. बाप जरी तिच्या जिवावर उठला तरी ते प्रेम तसुभरही कमी होत नसते. त्याचा प्रत्यय आणून देणारी घटना वास्तव घटना. अनिता ( काल्पनिक नाव) ही एका घराण्यातील आई-बापाची तशी लाडकी लेक. आपल्याच समाजमधील पदर लागणाऱ्या घराण्यात लेक द्यावी, तिचं हात पिवळं करुन कन्यादान करावं. मुलींच्या लग्नाच्या जबाबदारीतुन मोकळं व्हावं हा आई-वडिलांचा विचार.

पण या विचारालाच अनिता हिने कोलदांडा लावला. तिच्या स्वप्नातील राजकुमाराशी लग्न करण्याचा तिने चंग बांधला. तिचा तो मर्जीतील राजकुमार अनिल (काल्पनिक नाव) हा वेगळ्या समाजातील होता. लेक आयुष्यभरासाठी परजातीमधील तरुणाच्या हातात हात देतेय, हा विचार बाप सुभाष (काल्पनिक नाव) यांना न पटलेला. शेवटी अनिता हिने आई-वडिलांचे न ऐकता अनिल याच्यासोबत सप्तपदी चाललेली.

घरच्या मंडळींचा विरोध झुगारून अनिताने बंड करून परजातीच्या अनिलशी प्रेमविवाह केल्यामुळे संतापलेल्या वडिल सुभाष यांनी आपल्या घराण्याची इज्जत गेली म्हणून तिसऱ्याच दिवशी अनिता आणि जावई अनिल यांचा काटा काढण्याचा डाव रचलेला. मात्र तो अयशस्वी झालेला. त्यानंतर काही दिवसांनी बाप सुभाष हा पिस्तूल घेऊन एका मोटारीतून लेक अनिता आणि जावई अनिल यांना मारण्यासाठी तडक निघाला होता. मात्र, दरम्यान वाटेत रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांनी केलेल्या तपासणीत त्याच्या मोटारीत बेकायदा पिस्तूल सापडले. बाप सुभाषसह इतर दोघांना पोलिसांनी याप्रकरणी अटक केलेली. तपासादरम्यान पोटच्या मुलीने विरोध झुगारुन केलेल्या आंतरजातीय विवाहामुळे घराण्याची अब्रू गेली म्हणून संतापलेल्या बापाने 'सैराट' होऊन पोटच्या मुलीसह जावयाला खलास करण्याचा डाव रचल्याचे निष्पन्न झाले.

अटकेनंतर बाप सुभाषसह अन्य दोघा साथींदारांनी जामिनावर सुटण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. मात्र, बाप सुभाष तुरूंगातून सुटून बाहेर आला तर मुलगी अनिता आणि जावई अनिल या दोघांच्याही जीविताला धोका निर्माण होईल, असा आक्षेप सरकार पक्षाने घेतला होता. त्यातून तब्बल दोनवेळा बाप सुभाषचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. दरम्यान या खटल्यात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर पुन्हा बापाने जामीन अर्ज दाखल केला असता

पण अत्यंत महत्त्वाच्या ट्रॅकवर गरोदर झालेल्या अनिताचं जन्मदात्या पित्याबद्दल मन द्रवले. हृदय पाझरलं. तिने बापाला माफ करण्याचे मनापासून ठरविले. जावय अनिल यानेदेखील त्याला होकार दिला. त्यासाठी न्यायालयात शपथपत्र दाखल केले. पिता सुभाष यांना माफ करावे, त्यांच्यापासून मला आणि माझ्या अनिल याच्या जीवितास कोणताही धोका नाही. उलट, मी गरोदर असल्याने पित्याच्या आधाराची खरी गरज आहे. त्यामुळे पित्याला जामिनावर सुटका करण्यास कोणताही आक्षेप नसल्याचे तिने शपथपत्रात नमूद केले. तब्बल तीन महिन्यांनंतर बापाची तुरुंगातून सुटका झाली. या बहुचर्चित प्रकरणात बाप सुभाष तर्फे ज्येष्ठ फौजदारी वकील ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. सिद्धेश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम, ॲड. वैभव सुतार, ॲड. शिवप्रसाद ढोले काम पाहात आहेत.



संग्रहित चित्र

### पित्या–कन्येस या ओळी ठरल्या सार्थ

सिद्धनाथ नगरी पासून सुरु झालेले क्रोधाचे सैराटी वादळ अर्धनारी नटेश्वर नगरीतून पंढरीत आल्यानंतर पूर्णपणे विरून गेले! लेक बापाला नेहमी म्हणत असते.
'पाच बोटे अमृताचे, पंचप्राण तुमचे त्यात,
पाठीवरी फिरवा हात, या हो बाबा एकच वेळ!'

- बाप-लेकीच्या नात्यावर आलेले 'कटुते'चे ढग बाजूला सरले
- आंतरजातीय विवाहावरुन दुरावलेल्या नात्यांना पुन्हा बहर
- सिद्धनाथ नगरीपासून सुरु झालेले 'क्रोधाचे सैराटी वादळ' अर्धनारी नटेश्वर नगरीतून पंढरीत आल्यावर विरले पूर्ण

### खेळ कुणाला दैवाचा कळला?

आंतरजातीय तरुणाशी विवाह केला, घराण्याची सर्वत्र इज्जत, आब्रु धुळीला मिळविली. या संतापाने पिता सुभाष हा पिस्तूलने लेक अनिता आणि जावई अनिल यांना उडवणार होता. मात्र पुढे घडले ते वेगळेच. पण हळव्या लेकीचं मन पघळलं. तिनं बापाला माफ केलं. बापाबद्दल माया, ममता, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, हे सगळ जागं झालं. त्यातून तिनं तुरुंगात सडणाऱ्या बापाला बाहेर काढलं. 'खेळ कुणाला दैवाचा कळला?' याचा प्रत्यय या घटनेतून आला.

CMYK